# सकाळ

गुरुवार, २५ मार्च २०२१




**सातारा : छत्रपती शिवाजी कॉलेजमधील मराठी विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी नुकतीच सातारा आकाशवाणी केंद्रास भेट दिली.**

## 'सीएस'च्या विद्यार्थ्यांची आकाशवाणीस भेट

**सातारा :** छत्रपती शिवाजी कॉलेजमधील मराठी विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी नुकतीच सातारा आकाशवाणी केंद्रास भेट देऊन आकाशवाणी माध्यमाची माहिती घेतली. त्यावेळी मराठी विभागप्रमुख डॉ. सुभाष वाघमारे, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. आकाशवाणी माध्यमाची माहिती घेणे, आकाशवाणी कार्यक्रम आणि भाषा व्यवहार, आकाशवाणीत नोकरीच्या संधी कोणत्या आहेत, आकाशवाणी माध्यमात वापरली जाणारी भाषिक कौशल्ये कोणती आणि तिचे उपयोजन कसे होते, याची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. कार्यक्रम अधिकारी गोविंद मोकाशी, सोनाली भांड यांनी सखोल माहिती दिली. तसेच आकाशवाणी स्टुडिओ विद्यार्थी व प्राध्यापकांना दाखवण्यात आला. गोविंद मोकाशी यांनी पीपीटीद्वारे आकाशवाणीचा इतिहास सांगितला. डॉ. वाघमारे, रुचिरा इंगळे, प्रियांका मगरे, वैभव शेडगे, डॉ. कांचन नलावडे, वृषाली सावंत, प्रा.गजानन चव्हाण, महेश निकम, डॉ. संजयकुमार सरगडे, विक्रम इंगळे, वर्षा बागल, उर्मिला ससाणे, जयेश गोळे इत्यादींनी सहभाग घेतला.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा